एकोणिसावे शतक म्हणजे भारत देशात आभाळाच्या उंचीचे महापुरुष निर्माण करणारे शतक. या शतकात जन्मलेले सर्व महापुरुष जागतिक कीर्तीचे होते. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक ,महात्मा फुले ,शाहू महाराज ,क्रांतिसिंह नाना पाटील किती नावे घ्यावीत! यामध्ये तेजस्वी ताऱ्यासारखे चमकून गेले, ते कर्मवीर भाऊराव पाटील अण्णा .पृथ्वीच्या जन्मापासून अज्ञान अंधकारात धडपणाऱ्या बहुजन समाजाला शिक्षणाचे आणि ज्ञानाचे जीवनसौंदर्य प्राप्त व्हावे, म्हणून अण्णा रात्रंदिवस झटले. ज्ञानाचे अमृत घडे त्यांनी सर्वसामान्यात वाटले. गरिबांच्या झोपडीत विचारांची ज्योत पेटवली. माणसाला स्वत्त्वाची जाणीव शिकवली, त्यामुळे खेड्यापाड्यातील हजारो घरांना संस्कृतीची पालवी फुटली. विज्ञानवादी पुरोगामी महाराष्ट्र हे अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेची यशोगाथा आहे.

रघुराज मेटकरी या आमच्या मित्रांनी अण्णांचे चरित्र इथे अतिशय रसाळ भाषेत लिहिले आहे. रघुराज मराठी साहित्याचे गाढे व्यासंगी आहेत. विटा येथे गेली ४१ वर्षे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाची चळवळ चालवतात. कर्मवीरांच्यावरची सर्व पुस्तके वाचून मेटकरी यांनी हे अण्णांचे जीवन चरित्र साकारले आहे. हे चरित्र अभ्यासक, वाचक आणि संशोधक सर्वांच्या हृदयात अण्णांच्या कार्याची ज्योत पेटवेल. प्रेमळ, मुत्सद्दी,मिश्किल तरीही ध्येयनिष्ठ कर्मवीर अण्णा रघुराजनी एवढ्या सोप्या शब्दात मांडले आहेत.ते वाचकांना आपले वाटतील असा मला विश्वास वाटतो.

**प्रा. डॉ. मोहन राजमाने**

*- प्राचार्य संत गाडगे महाराज महाविद्यालय, कराड.*



ले ख क

**रघुराज मेटकरी**

ISBN : 978-93-917140-9-3

9 789391 714093

MRP ₹ 200

शुभम् साहित्य

लाखो मुलांना शिक्षणाची सावली देणारे
रयत शिक्षण संस्थेचे बळवंत महाविद्यालय विटा
यातील कर्मवीरांची तळमळ जोपासणाऱ्या
सर्वांना
ही कर्मवीरांची कहाणी अर्पण

- रघुराज मेटकरी

## -: अनुक्रमणिका :-


| | |
|---|---|
| कर्मवीरांचे घराणे | ५ |
| भाऊरावांचे बालपण | ११ |
| भाऊराव कोल्हापूरात | १५ |
| शाहु महाराजांच्या सहवासात | २४ |
| माणिकचंद हिराचंद जेव्हारी | २८ |
| भाऊरावांचा विवाह | ३१ |
| भाऊरावांच्या शिकवण्या | ३५ |
| डांबराचे डांबरी प्रकरण | ३८ |
| आईची माया | ४५ |
| भाऊरावांची नोकरी | ५१ |
| शैक्षणिककार्याची सुरूवात | ५५ |
| भाऊरावांची प्रतिज्ञा | ६० |
| चिरा चिरा हा घडवावा | ६३ |
| धनिणीच्या बागेत वसतीगृह | ६८ |
| महात्मा गांधीची वसतीगृहाला भेट | ७३ |
| चंदनाचे हात पाय ही चंदन | ७८ |
| लक्ष्मीबाई भाऊराव पाटील | ८२ |
| अण्णांची वणवण | ९१ |
| महाराजा सयाजीराव गायकवाड यांची भेट | ९४ |
| पुणे येथे युनियन बोर्डिंग | ९७ |
| कलेक्टर हमीद अली व ट्रेनिंग कॉलेज | १०० |
| चार भिंतीची जागा | १०४ |
| ज्ञानगंगा गावोगावी | १०७ |
| रयतच्या माध्यमिक शाळा | ११२ |
| बालकांची तळमळ | ११५ |
| अण्णांनी सांगितलेल्या आठवणी | ११७ |
| अण्णांची लोक प्रतिमा | १२१ |
| अण्णांचे उच्च शिक्षणात पाऊल | १२५ |
| गैरसमजातून संस्थेवर संकट | १२७ |
| अण्णांचे सत्कार | १३२ |
| अण्णांचे जीवन सुगंधी मोगरा | १३५ |

## कर्मवीरांचे घराणे



बीज लहानसे असते. ते स्वत:ला जमिनीत गाढून घेते नंतर योग्य त्या हवामानाचा लाभ घेत स्वत: अकुंरते त्याला पाने फुटतात. ते वाढू लागते. त्याला फांद्या फुटू लागतात त्यांचा विस्तार होतो आणि त्या लहानशा बीजामधून प्रचंड वृक्ष निर्माण होतो. हा निसर्गाचा नियम आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी हा नियम लागू पडतो. प्रत्येक व्यक्तीला निसर्गाच्या या लिलेमधूनच प्रवास करावा लागतो. जन्म होतो, बालपण आनंदात जाते, युवाअवस्था प्रौढत्व यात झगडावे लागते झुंज घ्यावी लागते. आणि मग ज्येष्ठत्व सर्वार्थाने बहरत जाते.

कर्मवीर भाऊराव पाटील हिमालय पर्वाता एवढे महान व्यक्तीमत्त्व होते. त्यांनी केलेल्या कार्याचा, घेतलेल्या ध्येयाचा परिणाम या महाराष्ट्र भूमीवर झाला. एवढे नव्हे भारत देशावर झाला. कर्मवीर अण्णांच्या उज्वल कार्याने अज्ञानाचा अंधकार नाहीसा करीत लाखोलाखो मुले शिक्षण घेऊन प्रगल्भ झाली. त्यानी देशाला प्रगती पथावर नेण्यासाठी प्रयत्न केले. त्यांचेही जीवन सुखी झाले. अण्णानी या भारतीय समाजातील जातीयता जळून जावी म्हणून त्याला चुड